**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १८ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा, इंडिया आघाडी आज उमेदवार ठरवणार.**
2. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातल्या पावसाचा आढावा घेतला.**
3. **100 दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेत महावितरणच्या नागपूर परिमंडल कार्यालयाने विभागस्तरीय कार्यालयांच्या गटात राज्यात पटकावला प्रथम क्रमांक.**
4. **भालाफेकपटू नीरज चोप्रा याचा डायमंड लीगमधे प्रवेश निश्चित.**

---

उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचं नाव घोषित करण्यात आलं आहे. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांनी काल दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. आघाडीतल्या सर्व सहकारी पक्षांनी या निर्णयाला पाठिंबा दिल्याचं सांगून, उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक सर्वपक्षीय सहमतीनं व्हावी यासाठी सर्व पक्षांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. गेल्या आठवडाभरात आघाडीतील पक्ष आणि विरोधी पक्षांशी या संदर्भात चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. संसदीय मंडळ सदस्यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह देखील यासंदर्भातल्या बैठकीला उपस्थित होते. पुढील महिन्याच्या ९ तारखेला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे. राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही राधाकृष्णन यांच्या

उमेदवारीचं स्वागत केलं आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं आहे. उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन आज दिल्लीला रवाना झाले.

---

इंडिया आघाडी उपराष्ट्रपतीपद

इंडिया आघाडी उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवाराची घोषणा आज करणार असल्याचं काँग्रेस महासचिव के सी वेणुगोपाल यांनी सांगितलं. आघाडीतल्या सर्व पक्षांशी चर्चा सुरू असून सहमतीने उमेदवार ठरवला जाईल असं ते म्हणाले.

---

बनावट कीटकनाशके

बनावट कीटकनाशके, खत आणि बियाणे तयार करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. चौहान यांनी मध्य प्रदेश दौऱ्यात बनावट रसायनांच्या फवारणीमुळे सोयाबीन पिकांना झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला, त्यानंतर ते बोलत होते.

***(होल्ड बाईट - केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान)***

***खेत में सोयाबीन की जगह खरपतवार खड़ा है। किसी एचपीएम कंपनी की दवाई डालने के कारण ये हुआ है। एक उच्च स्तरीय वैज्ञानिक का दल इन खेतों का निरीक्षण करेगा और जीस कंपनी ने ऐसी दवाई दी किसानों को जिससे किसान तबाह हो गए, विधि सम्मत सख्त कार्रवाई उसके खिलाफ की जाएगी और एक अभियान शुरू होगा पूरे देश में ऐसी कंपनियों के खिलाफ़।***

---

संसद

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आज लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेतही कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी मतदार याद्या पुनरीक्षणावर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी केली. दरम्यान, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी हौद्यात उतरत घोषणाबाजी सुरू केली. या सदस्यांनी सरकारी मालमत्तेचं नुकसान केलं, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिला. मात्र, त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत नंतर दोन आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आजही विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सभागृहांमध्ये जोरदार घोषणाबाजी केली. विविध

राजकीय पक्षांकडून १९ स्थगन प्रस्ताव मिळाले असून त्यातले काही बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणाबाबतच्या असल्याची माहिती उपसभापती हरिवंश यांनी दिली. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं सांगून या सर्व सूचना त्यांनी फेटाळल्या.

---

राहुल गांधी

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली मतदार अधिकार यात्रा आज दुसऱ्या दिवशी बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातल्या देव इथं पोहोचली. औरंगाबाद इथल्या सूर्य मंदिरात जाऊन गांधी यांनी दर्शन घेतलं. बिहारमधील मतदार यादीत केल्या जाणाऱ्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेला विरोध करण्यासाठी मतदार अधिकार यात्रा काढली आहे. १६ दिवस चालणाऱ्या या यात्रेत इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. ही यात्रा २० हून अधिक जिल्ह्यांत जाणार असून १ सप्टेंबर रोजी पटना इथल्या गांधी मैदानात समारोप सभा होईल.

---

पावसाचा आढावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातल्या पावसाचा आढावा घेतला. तसंच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. मुंबईत आज सकाळी ६ ते ८ या कालावधीत १७० मिलिमिटर पावसाची नोंद झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोकण विभागाचं सर्वात जास्त पाऊस झाल्याचं ते म्हणाले. १५-१६ जिल्ह्यांना पावसाचा रेड तसंच ऑरेंज अलर्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. मराठवाड्यातल्या ८०० गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून १ लाख हेक्टर शेतीचं नुकसान झालं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

---

महावितरण

सरकारी कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 100 दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेने मोठे यश मिळवले आहे. या मोहिमेत राज्यातील 12 हजार 500 कार्यालयांनी सहभाग घेतला होता. या यशस्वी मोहिमेत, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण)च्या नागपूर परिमंडल कार्यालयाने विभागस्तरीय कार्यालयांच्या

गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, नागपूर प्रादेशिक संचालक कार्यालयालाही या मोहिमेत तृतीय क्रमांक मिळाला आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित एका विशेष कार्यक्रमात, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांना महसूल मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले.

---------------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेलवे

दक्षिण पूर्व मध्य रेलवे नागपूर विभाग टप्प्याटप्प्याने सर्व उपलब्ध लेव्हल क्रॉसिंग बंद करत आहे आणि त्या जागी अंडरपास किंवा रोड ओव्हर ब्रिज बांधले जात आहेत. या क्रमाने, नागपूर विभागाने आज गोंदिया-गंगाझरी रेल्वे विभागात रोड ओव्हर ब्रिज क्रमांक ५१२ साठी ६२.५ मीटर लांबीचा बो स्ट्रिंग गर्डर यशस्वीरित्या लाँच केला. या गर्डर लाँचिंग कामासोबतच, विभागाने सुरक्षा आणि सुरक्षेशी संबंधित अनेक कामे यशस्वीरित्या पूर्ण केली. विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी नागपूर विभागात संरचनात्मक क्षमता वाढविण्यावर भर दिला आहे.

---------------------------------------------

नीरज चोप्रा

विद्यमान विश्वविजेता आणि दोनवेळा ऑलिम्पिक पदक पटकावणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं डायमंड लीगच्या अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी स्वित्झर्लंडमध्ये ही स्पर्धा होईल. नुकत्याच झालेल्या सिलेसिया लीगमध्ये त्यानं भाग घेतला नसला, तरी या हंगामातली त्याची कामगिरी उत्तम असल्यामुळे तो डायमंड लीगसाठी पात्र ठरला. अँडरसन पीटर्स आणि लुईज मॉरिशिओ दा सिल्वा यांच्यासारखे त्याचे प्रतिस्पर्धीही या स्पर्धेसाठी पात्र ठरण्याच्या मार्गावर आहेत. नीरज चोप्रा यानं २०२२ मध्ये डायमंड लीगचं जेतेपद पटकावलं होतं, तर २०२३ आणि २०२४ मध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

---------------------------------------------

पाऊस-हवामान

येत्या काही तासात अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ

येण्याची शक्यता आहे. यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी आणि अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, वाशीम, बुलढाणा या विदर्भातील तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. बुलढाणा जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाने दमदार हजेरी लावल्याने जिल्ह्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आला आहे तर हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे परिणामी शेतकऱ्यांच्या पिकाचं मोठं नुकसान झाल आहे. सकाळपासून चिखली ते मेहकर, नागपूर ते मुंबई महामार्ग, खामगाव ते मेहकर, बुलढाणा ते चिखली यासह जिल्ह्यातील अनेक छोटे, मोठे रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत. रस्त्यावर दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली असून  ग्रामीण भागात असलेल्या नदी नाल्यांना पूर आल्याने काठावरील पाणी सुद्धा घरामध्ये शिरल्याने अनेक घरांची पडझड झाली आहे.

---------------------------------------------